माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये प्राप्त झालेले द्वितीय अपील

**अपील क्रमांक : ८७५/२०२२**

**अपिलार्थी – श्री. अमोल भैय्याजी किन्नाके**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा जेष्ठ सहाय्यक (पं),**
**पंचायत समिती, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.१२.२०२१ | ३०.१२.२०२१ | २७.०१.२०२२ | २१.०२.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.०६.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "पंचायत समिती, वरोरा अंतर्गत समाविष्ट असलेल्या गटग्रामपंचायत खापरी (टाकळी) येथे पार पडलेल्या ग्राम पंचायत शिपाई पदभरती संबंधित पंचायत स्तरावरून मार्च २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधी दरम्यान करण्यात आलेल्या सर्व चौकशी अहवालाची सत्यप्रत मिळणेबाबत", माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, "या प्रकरणाच्या चौकशी करिता या कार्यालयाकडून चौकशी समिती गठीत करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने सदर चौकशी समितीने परिपूर्ण चौकशी करून चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केला असता या कार्यालयाचे पत्र क्र. पंसव/पंचा/स्थाप-१/३३०/२०२०, दि. १८.१२.२०२० अन्वये मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना चौकशी अहवाल पुढील कार्यवाहीस सादर करण्यात आला आहे. परंतु वरिष्ठ कार्यालयाकडून याबाबतचा अंतिम अहवाल आजतागत प्राप्त झाला नाही", असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी

यांनी **दि. २७.०१.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "मागितलेली माहिती वेळेत मिळाली नाही" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून, "अर्जदाराने दि. ०६.१२.२०२१ चे अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा जेष्ठ सहायक (पं) यांनी सदर चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थींना ७ दिवसाचे आत पुरविण्यात यावी", असे आदेशित करून अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दि. १९.०३.२०२२** रोजी "आदेशानंतरही आजपावेतो माहिती पुरविली नाही" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. २४.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. ०८.०५.२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा जेष्ठ सहायक (पं), पंचायत समिती, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर, श्रीमती जया खुलवटकर ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर, श्री. शेंडे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. डांगरे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. अमोल भैय्याजी किन्नाके यांनी दि. ०६.१२.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार गटग्रामपंचायत खापरी (टाकळी) येथे पार पडलेल्या ग्राम पंचायत शिपाई पदभरती संबंधित पंचायत स्तरावरून मार्च २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधी दरम्यान करण्यात आलेल्या सर्व चौकशी अहवालाची सत्यप्रत मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. त्यावर दि. ३०.१२.२०२१ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा जेष्ठ सहायक (पं), पंचायत समिती, वरोरा यांनी सदर चौकशी समितीने परिपूर्ण चौकशी करून चौकशी अहवाल पंचायत समिती, वरोरा येथे सादर केला असता कार्यालयाचे पत्र दि. १८.१२.२०२० अन्वये मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना चौकशी अहवाल पुढील कार्यवाहीस सादर करण्यात आला आहे. परंतु वरिष्ठ कार्यालयाकडून याबाबतचा अंतिम अहवाल प्राप्त झाला नाही असे नमूद करित व सदरील अहवाल प्राप्त होताच प्रदान करण्यात येईल असा प्रतिसाद दिला. त्यावर दि.२७.०१.२०२२ रोजी विहित मुदतीत माहिती मिळाल्याचा आक्षेप नोंदवित प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर दि. २१.०२.२०२२ रोजी आदेश पारित करण्यात आला. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वरोरा यांनी चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थींना ७ दिवसाचे आत पुरविण्याचे स्पष्ट निर्देश जन माहिती अधिकारी तथा जेष्ठ सहायक (पं), पंचायत समिती, वरोरा यांना दिले. मात्र वरील निर्देशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित दि. १९.०३.२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला आहे.

आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थी हजर नसून तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. डांगरे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. प्रस्तुत प्रकरणी जिल्हा परिषदेकडून याबाबतचा अंतिम अहवाल प्राप्त झाला नसल्याबाबत नमूद केले. त्यामुळेच अहवाल अपिलार्थीस देण्यात आला नसल्याचे श्री. डांगरे यांनी नमूद केले. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशात अतिशय स्पष्टपणे चौकशी समितीने तयार केलेल्या अहवालाची प्रत ७ दिवसात अपिलार्थीस पुरविण्याचे स्पष्ट निर्देश दिले असून त्या सुनावणीस श्री. डांगरे हेदेखील उपस्थित होते. मात्र वरील आदेशाचे

जवळजवळ २६ महिन्यानंतरही अनुपालन झाले नसल्याचे आढळून येते. झालेला विलंब हा पूर्णत: असमर्थनीय असून याबाबतीत दिलेले कारण हे पूर्णत: असमाधानकारक आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिकारी यांनी नमूद केलेल्या चौकशी अहवालाची प्रत तात्काळ अपिलार्थीस प्रदान करावी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाचे अद्यापही अनुपालन झाले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये शास्ती कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा स्वयंस्पष्ट खुलासा वरील आदेश प्राप्त होताच दोन आठवड्याच्या आत कळविण्यात यावा. वरील सुनावणीची संधी ही नैसर्गिक न्यायतत्वाला अनुसरून व माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० (१) नुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत असून त्यांचा खुलासा विहित मुदतीत सादर न झाल्यास एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल.

## <u>अंतरिम आदेश</u>

**उपरोक्तप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा खुलासा आदेश प्राप्त होताच दोन आठवड्याचा आत सादर करावा.**

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०८.०५.२०२४**

जावक क्रमांक ----- E४०५ ----------दिनांक ----- 30 AUG 2024 ----------